**इतर मागासवर्गीय जातीमधील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट (Creamy Layer) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी निकष निश्चित करण्याबाबत....**

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- सीबीसी-१०/२००८/प्र.क्र. ६९७ /मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ जानेवारी, २००९

वाचा :- १) शासन निर्णय,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्रमांक -सीबीसी-१०९४/ प्र.क्र.८६/मावक-५, दि. १६ जून १९९४.
२) शासन निर्णय,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्रमांक -सीबीसी-१०९४/ प्र.क्र.८६/मावक-५, दि. १६ जून १९९७.
३) शासन निर्णय, विमुक्ती जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग,
क्रमांक :- सीबीसी-१०९४/प्र.क्र. ८६/इमाव-५, दिनांक ६ जुन, २०००
४) शासन निर्णय,सामाजिक न्याय ,सांस्कृतिक कार्य , क्रीडा व विशेष सहाय विभाग,
क्रमांक -सीबीसी-१०/२००१/ प्र.क्र.१११/मावक-५, दि. २९ मे, २००३ .
५) शासन परिपत्रक ,सामाजिक न्याय ,सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग,
क्रमांक -सीबीसी-१०९४/ प्र.क्र.८६/मावक-५, दि. ३० जून २००६.
६) शासन निर्णय ,सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग,
क्रमांक :- सीबीसी-१०/२००६/प्र क्र १२२/मावक-५, दिनांक २० ऑक्टोबर, २००६.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसुचीत जमाती, (वि.जा) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ ,( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ) अन्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती /गट वगळुन आरक्षणाचे फायदे लागू करण्यात आलेले आहेत. उच्च व उन्नत व्यक्ती गटासाठी राज्य शासनाने, शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोबर, २००६ अन्वये रु. ४.०० लाख वार्षिक एवढी कौटुंबिक उत्पन्न मर्यादा निश्चित केलेली आहे. सदर उत्पन्न मर्यादा केंद्र शासनाच्या धर्तीवर रु. ४.५० लाख एवढी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- राज्यातील विमुक्त जाती , भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यामधील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट या करीता नॉन क्रिमिलेअरसाठी असलेली उत्पन्न मर्यादा ही रु. ४.०० लाखावरुन रु. ४.५० लाख इतकी वाढविण्यास शासन मान्यता देत आहे. ज्यांचे उत्पन्न मागील सलग तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु. ४.५० लाखापेक्षा जास्त आहे अशांना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. रु. ४.५० लाख ही मर्यादा पुढील आदेशापर्यंत अंमलात राहील.

२. वरील उत्पन्नाचे निकष महाराष्ट्र राज्यातर्फे दिल्या जाणा-या सवलतींकरिता लागू आहेत.

३. केंद्र शासनाने इतर मागासवर्गीय जाती मधील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट ( Creamy Layer) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी त्यांचेकडील दिनांक १३ व १४ ऑक्टोबर, २००८ च्या कार्यालयीन आदेशान्वये उत्पन्नाच्या निकषात सुधारणा करुन उत्पन्न मर्यादेत वाढ करुन ती रुपये ४.५० लाख वार्षिक करण्यात आलेली आहे. ( प्रत राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे ) केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आरक्षण व सेवाविषयक लाभासाठी इतर मागासवर्गीय व्यक्तींना रुपये ४.५० लाख एवढी उत्पन्न मर्यादा लागू राहील, त्या दृष्टीने केंद्र शासनाचे आरक्षणविषयक फायदे घेताना उन्नत व प्रगत व्यक्ती / गट याबाबतचे जे निकष केंद्राने लागू केले आहेत ते निकष केंद्र शासनाने महाराष्ट्राशी संबंधित जी इतर मागासवर्गाची यादी निश्चित केली आहे त्यांना लागू राहतील. केंद्र शासनाने (नॉन क्रिमिलेअर ) उच्च व उन्नत गटात मोडत नसल्या संदर्भात जे निकष व निर्देश दिलेले आहेत , तेच निकष व निर्देश महाराष्ट्र राज्यातील उच्च व उन्नत गटासाठी लागू रहातील. तसेच , केंद्र शासनाकडून यापुढे ज्या ज्या वेळी उत्पन्न मर्यादेत वाढ केली जाईल , तीच उत्पन्न मर्यादा यापुढे महाराष्ट्र राज्यातील आरक्षण सोयी सवलतीकरीता उन्नत व प्रगत गट / व्यक्ती या करीता लागु राहील.

४. सदर आदेश हे दिनांक १ एप्रिल, २००९ पासून अंमलात येतील व रु. ४.५० लाखही उत्पन्न मर्यादा दि. ०१ एप्रिल, २००९ पासून लागू असेल.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर दर्शविण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक : **२००९०११३१५५३१६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( एन. आरुमुगम )**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति, मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग , मुंबई (पत्राने )
महालेखापाल महाराष्ट्र -१, मुंबई.
महालेखापाल महाराष्ट्र -२, नागपूर.
सर्व विभागीय आयुक्त ,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई / नागपूर खंडपीठ / औरंगाबाद खंडपीठ
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक,, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य , पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त आदेश त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावेत.

सर्व जिल्हादंडाधिकारी
सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल )
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

यांना कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयाला व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व कार्यासने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ,
निवड नस्ती, का-मावक-५.